मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्पाकरिता सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे.पीडब्ल्युसी कंपनीस मार्च-२०१९ ते एप्रिल-२०१९ या दोन महिन्यांच्या कालावधीकरिता केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीसीटी -३६१६ /प्र.क्र.७६/भाग-४ /पोल-३
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २५ जून, २०१९.

वाचा:

१. महाराष्ट्र शासन (माहिती व तंत्रज्ञान विभाग) व मे.प्राईस वॉटर हाऊस कूपर प्रा.ली. यांच्या दरम्यान करण्यात आलेला करारनामा, दिनांक १७.११.२००९.
२. शासन निर्णय, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, क्र.GAD-मातंस ०८०/४/ २०१४-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH), दिनांक ०१.०७.२०१४, १९.०७.२०१७ व ०९.१०.२०१७
३. शासन निर्णय, गृह विभाग, क्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.९३/पोल-३, दिनांक २९.०५.२०१५ .
४. शासन निर्णय, गृह विभाग, क्र. सीसीटी ३६१५/प्र.क्र.७६/भाग-१/पोल-३, दिनांक २५.०७.२०१६ व २५.०७.२०१७.
५. शासन निर्णय, माहिती व तंत्रज्ञान विभाग, क्र. GAD मातंसं ०८०/४/२०१४-O/O, दिनांक २०.०३.२०१८.
६. शासन निर्णय, गृह विभाग, क्र. सीसीटी-३६१६/प्र.क्र.७६/भाग-१/पोल-३, दिनांक १३. १२. २०१८.
७. मे. प्राईस वॉटर हाऊस कूपर प्रा.ली., यांचे पत्र क्र.-, दिनांक ०४.०४.२०१९ व पत्र क्र.-, दिनांक ०६.०५.२०१९.

प्रस्तावना :-

संदर्भ क्र.१ रोजीच्या करारानाम्याव्दारे मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी मे.प्राईस वॉटरहाऊस कूपर्स प्रा.ली., या कंपनीची प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयाव्दारे मे.पीड्ब्ल्यूसी कंपनीला मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून दिनांक ०१.०५.२०१८ पासून ३०.०४.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये निश्चित केल्यानुसार त्यांना मानधन अनुज्ञेय करण्यात आले आहे. सदर कंपनीने उपरोक्त प्रकल्पासंदर्भात प्रकल्प सल्लागार म्हणून मार्च २०१९ ते एप्रिल २०१९ या दोन महिन्याच्या कालावधीसाठी पाहिलेल्या कामाची देयके उपरोक्त संदर्भ क्र.७ येथील

पत्राव्दारे सादर केली आहेत. त्या अनुसार उक्त देयके अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी मे.पीड्ब्ल्युसी कंपनीने मार्च २०१९ ते एप्रिल २०१९ या दोन महिन्यांच्या कालावधीसाठी सल्लागार म्हणून पाहिलेल्या कामासाठी (मानधन, इतर खर्च व वस्तू आणि सेवा कर मिळून) त्यांना रु. १७,७३,५४०/- (अक्षरी सतरा लाख त्र्याहत्तर हजार पाचशे चाळीस रुपये फक्त) इतक्या रकमेची देयके अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर देयकांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

Mumbai CCTV Project (March 2019 to April 2019)

#	Period	Month	Resource Name	Designation	Man Month Rate (INR)	Deployment (Percentage)	Applicable Amount per Resource (INR)	Total Applicable Amount (INR)	OPE Claimed (INR)	Sub Total (INR)	GST @ 18%	Total Amount (INR)
A	B	C	D	E	F	G	H = FXG	I	J	K = I+J	L = 18% OF K	M = K+L
1	01st March 2019 to 30th April 2019	Mar-19	Shri. Subhash Patil	Principal Consultant	3,24,000	25%	81,000	7,51,500	0	7,51,500	1,35,270	8,86,770
			Shri. Nikhil Pande	Managing Consultant	2,79,000	50%	1,39,500					
			Shri. Abul Zaidi	Managing Consultant	2,79,000	100%	2,79,000					
			Shri. Ravi Kumar	Senior Consultant	2,52,000	100%	2,52,000					
2		Apr-19	Shri. Subhash Patil	Principal Consultant	3,24,000	25%	81,000	7,51,500	0	7,51,500	1,35,270	8,86,770
			Shri. Nikhil Pande	Managing Consultant	2,79,000	50%	1,39,500					
			Shri. Abul Zaidi	Managing Consultant	2,79,000	100%	2,79,000					
			Shri. Ravi Kumar	Senior Consultant	2,52,000	100%	2,52,000					
Total								**15,03,000**	**0**	**15,03,000**	**2,70,540**	**17,73,540**

टीपः-

अ) उपरोक्त रकमा ह्या दरमहिना दरमाणूस (Man-Month) तत्वानुसार अदा करण्यात येत आहे.

ब) शासन निर्णय संदर्भ क्र.३ अनुसार सल्लागारांना प्रकल्पावर होणा-या खर्चाच्या ५ % च्या प्रमाणात प्रवास, भोजन व निवास इ. खर्च अनुज्ञेय करण्यात आला आहे.

क) संदर्भ क्र.७ अन्वये मे. पीड्ब्ल्युसी कंपनीने सादर केलेल्या "Invoice" अनुसार उक्त रकमा देण्यात येत आहे. सदर रकमेमध्ये मार्च २०१९ ते एप्रिल २०१९ या दोन महिन्यासाठी १८ % वस्तू आणि सेवा कर समाविष्ट करण्यात आला आहे.

ड) सीसीटीव्ही प्रकल्पासाठी संबंधित कंपनीला सल्लागाराच्या मानधनापोटी जादा रक्कम अदा केली आहे असे निदर्शनास आल्यास अशी जादा रक्कम संबंधित कंपनीकडून समायोजित करण्याचा अधिकार शासनास राहील.

इ) उक्त देयके ही अंमलात असलेले कर वजाती करून अदा करण्यात यावी.

२. उक्त खर्च हा "२०५५-पोलीस, (०२) (०१) शहर पोलीस आस्थापना, (दत्तमत) (२०५५ ००९७), ५०-इतर खर्च" या तपशीलवार लेखाशीर्षाखाली सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे, तर त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७०३१७०८४४३१२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI, serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.07.03 17:16:26 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति :

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्य मंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
४. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई.
५. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
९. मे.पीडब्ल्यूसी प्रा.लि., २५२, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर, मुंबई - ४०००२८.
१०. कार्यासन अधिकारी (व्यय-७/विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. कार्यासन अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवड फाईल/ पोल-३.